**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.८४/२०२१**
निशाणी क्र. ३४ पुढे सुरु

**अर्जदारातर्फे साक्षीदाराचा उर्वरित उलटतपास**
**सामनेवाला तर्फे विधिज्ञ श्री. ए. एल. वेलदे यांचे मार्फत शपथेवर सुरु**

हे म्हणणे खरे आहे की, माझे शिक्षण झालेले नाही त्यामुळे मी निशाणी अंगठा करते. हे म्हणणे खरे आहे की, सामनवोला व माझा सन १९९२ साली सुलेनामा झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुलेनाम्यानंतर प्रस्तुतची पहिलीच केस असुन इतर कोणतीही केस दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गेल्या २५ ते ३० वर्षांमध्ये सामनेवाला विरुध्द प्रस्तुत केस शिवाय इतर केस दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सध्या मौजे निंबे नांदुर येथे राहते. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई मयत झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, तिला अर्धांगवायु झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल कोंडीबा जयवंत वाकडे मयत झाले आहेत.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावे मौजे माका येथे गट क्र.१८३ मध्ये जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, माजे निंबे येथील गट क्र.४९ वर माझे नाव लागले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माका येथील जमीनीच्या सातबाराला माझे नाव, वडिलाचे नाव, भावाचे नाव आजही कायम आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन मिळकत बागायती आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्न ख्रिश्चन पध्दतीने झाले आहे.

सामनेवाला यास दोन बहिणी व एक भाऊ आहे व त्याचे आईवडिल मयत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या लग्नानंतर मी चिलेखनवाडी येथे नांदायला गेले. हे म्हणणे खरे नाही की, सदर गावात पाण्याची परिस्थितीची बेताची होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर गावात पाणी नसल्यामुळे माझा भाऊ मला तेथे नांदु देत नव्हता. चिलेखनवाडी येथून नगर येथे राहायला गेल्याची त्याची तारीख, वर्ष मला आठवत नाही. नगर येथे शेजारी कोण राहायला होते त्यांचे नाव आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नगरला राहायला आले नव्हते त्यामुळे मला सदर बाब माहित नाही.

प्रभाकर खंडागळे व लक्ष्मण पिटेकर यांना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ते सामनेवाला सोबत निंबेनांदुर येथे मला घेवून जाण्यासाठी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे आईने मुलगी नांदायला पाठवायची नाही असे म्हणून नकार

दिला. हे म्हणणे खरे नाही की, माझे आईला अर्धांगवायु झाल्यामुळे माझा भाऊ व वडिल हे मला माहेरी घेवून गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा किशोर हा संगमनेर येथे कंपनीत नोकरीला आहे व त्याला रु.३०,०००/– ते ३५,०००/– पगार आजही आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनवोला याने मला कधीही मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मारहाणीमुळे माझ्या मणक्याला मार लागल्याचे मी खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी मारहाण झाल्याची तारीख लिहीलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजही मळ्यामध्ये कामधंदा करते. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला यास चिलेखनवाडी येथे जिरायत जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला, त्याची बहिण व इतर कुटुंब मिळून सामनेवालास अतिशम कमी जमीन वाट्याला येते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे सामनेवाला यास लाखाचे उत्पन्न जमीनीतून मिळत नाही.

हे म्हणणे खरे नाही की, मला शासनाकडून अनुदान मिळते. हे म्हणणे खरे नाही की, मला श्रावण बाळ योजनेतून रु.२,०००/– महिना मिळतो व तो माझे ढोरजळगांव येथील बँकेच्या खात्यात जमा होते. हे म्हणणे खरे नाही की, मला पंतप्रधान योजनेचे रु.२,०००/– दरमहा बँकेत जमा होतात. हे म्हणणे खरे नाही की, माझे मौजे ढोरजळगाव येथे ए.डी.सी.सी. बँकेत खाते आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला घरकुल योजना मिळाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला सर्व योजनांचा लाभ मिळालेला आहे परंतु, मी न्यायालया समक्ष खोटे नमूद केले आहे.

हे म्हणणे खरे नाही की, मौजे माका येथील जमीनीवर मी कागदोपत्री हक्कसोड केला आहे परंतु जमीन माझ्या नावे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मौजे निंबे येथील जमीनीतून मी उत्पन्न घेते. हे म्हणणे खरे नाही की, अहमदनगर येथील जागा सामनेवाला याने ५ ते ६ वर्षांपूर्वीच विकली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतीतून सामनवोलास कोणतेही उत्पन्न मिळत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सामनेवालाकडे स्वतःहून नांदत नाही व सामनेवाला याची आजही मला नांदवायची इच्छा आहे. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाने आदेश केल्यानंतर देखील मी सामनेवालाकडे नांदायला गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मौजे निंबे येथील मिळकतीतून गहु, हरबरा असे नगदी पिके मी व माझा भाऊ घेतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावजयीचे व माझ्या आईवडिलांशी पटत नव्हते त्यामुळे मला आई–वडीलांच्या देखभालीसाठी माहेरी बोलावून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवालाने पैश्या अभावि त्याचे मणक्याचे

ऑपरेशन केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अतिशय थोडी पेंशन सामनवाला यास मिळते. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे व सामनेवालावर अवलंबून नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला मुलगा रुपये दहा हजार देतो. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणिवपूर्वक खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत,

दिनांकः– ०३/१०/२०२५

(वैशाली सं. मोरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.०२) शेवगाव.